# जिल्हा पोलीस कर्मचारी मानसिक स्वास्थ्य: एक अभ्यास

**डॉ. एस.जे. गायकवाड**
सहाय्यक प्राध्यापक, मानसशास्त्र विभाग
अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना

**प्रस्तावना :**

समाजात घडणा-या अनुचित प्रकारांना आळा घालण्यासाठी पोलीस हा समाज व्यवस्थेचा कणा समजला जातो. प्रत्यक्ष सेवा, जबाबदारी, कर्तव्य, ह्या गुणांचे त्यांच्या मनावरती नेहमी संस्कार बिंबवले जातात. पोलीस प्रशासनामध्ये तशा प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते. शिक्षण उक्तीप्रमाणे पोलीस हा समाज व्यवस्थेचा आरसा आहे. जो नेहमी त्यांच्या कार्यातुन चांगल्या वाईट अनुभवांची ओळख जगासमोर ठेवत असतो. उदा. मुंबई बॉम्बस्फोट, भुकंप, जलप्रलय सरकारी अधिवेशन, दंगल, निवडणुक कार्यप्रणाली, प्रशासन, सुव्यवस्था, मानव व मानवी निती मुल्यांची पायमल्ली होणार नाही, यासाठी ते नेहमी जागरुक असतात.

‘सदरक्षणाय खलनिग्रहाय’ ब्रीद उक्ती आधारे त्यांनी समाजाचे संरक्षण करणे, सेवा जबाबदारी कर्तव्याने पेलण्यासाठी त्यांची स्वत:ची ओळख निर्माण केलेली आहे. पोलीस जनतेचे शत्रु नसुन मित्र आहेत. जनमाणसात त्यांना मानाचे स्थान लाभावे, त्यांची सामाजिक प्रतिमा स्वच्छ व सुंदर व्हावी यासाठी ते नेहमी कर्तव्य तत्पर असतात. कारण अशा जबाबदारी पुर्ण भावनेतुन जनतेचे सेवक समजले जातात.

लोकशाहीत जनता ही महत्वाची मानु जनतेच्या भावनेचा विरोधात जाऊन शासन किंवा शासकीय यंत्रणा काम करु शकत नाही. पोलीस कामकाजातील गुन्हांचा तपास असो किंवा कायदा व सुव्यस्थेचा प्रश्न असो. जनतेच्या सहकार्याशिवाय कोणतीही गोष्ट साध्य करणे शक्य नाही.

**मानसिक आरोग्य:**

मानवी विचार भावना वर्तन आणि व्यक्तीसाठी आवश्यक असणारी शारिरीक व मानसिक स्थिती यावर व्यक्तीचे मानसिक आरोग्य अवलंबुन असते. विचार, वर्तन, प्रतिक्रिया सातत्य व स्थिरता हे गुण असतो.

समाजस्थित विचार हा शारिरीक तक्रारीवर असतो. आज सर्वसाधारण विषयास्थित भीती, अवास्तव चिंता, राग, चिडचिडेपणा हा शारिरीक घटकाप्रमाणे तसाच मानसिक घटकांशी निगडीत असतो.

**मानसिक आरोग्याबाबतचे दृष्टीकोन (Aspects of Mental Health)**

जगप्रसिध्द मानसशास्त्रज्ञ फिलीपपिनल यांनी १७४५-१८२६ यामध्ये मानसिक आरोग्याचे कार्य केले. इंग्लंडमध्ये विल्यंम टयुक अमेरिकेत बेंजोमिन रश आदींनी अनुक्रमे कौटुंबिक वातावरणात, मनोरुग्णांवर उपचार केले. डॉ. सिंग्मड फ्राईड यांनी अबोधवस्था व मनोविकृती यांचा संबंध प्रतिपादित केला. विसाव्या शतकात क्लीफर्ड बिअर्स National Concinnity for Mental Health ही संघटना स्थापन केली. World Health Organization (WHO) या सारख्या संघटना अस्तित्वात येऊन मानसिक आरोग्य वाढवण्यासाठी तत्पर झाल्या.

**शोधाचे विवरण:**

जालना पोलीस ठाणे अंतर्गत काम करणा-या पोलीस कर्मचारी यांचे मानसिक स्वास्थ्याचे मापन करण्यात आले. प्रत्यक्ष जबाबदारी असणा-या १०० पोलीस कर्मचा-यांच्या मानसिक आरोग्याचा अभ्यास करण्यासाठी डॉ. कमलेश शर्मा यांची Mental Health Scale चा वापर करण्यात आला आहे.

**उद्देश**

- जालना पोलीस कर्मचारी यांच्या मानसिक स्वास्थ्याचे मापन करणे.
- वयोगट २० ते ४० या वयोगटातील पोलीस कर्मचा-यांचे मानसिक स्वास्थ्य तपासणे.
- उद्दिष्ट साध्य करण्यासाठी गृहितकाची मांडणी केली.
- गृहितकाची तपासणी करण्यासाठी संशोधनाचा आराखडा तयार केला.
- जालना पोलीस स्टेशन अंतर्गत १०० पोलीस कर्मचारी मानसिक स्वास्थ्य तपासण्यासाठी अभ्यास करण्यात आला आहे.
- डॉ. कमलेश शर्मा यांची मानसिक स्वास्थ्य प्रश्नावलीचा वापर करण्यात आला आहे.
- संख्याशास्त्रीय विश्लेषण व अन्वयार्थ लावण्यासाठी मध्यमान (Mean), प्रमाण विचलन (SD) काढणे

**संशोधनाचे उद्दिष्टये:**

- पोलीस ठाणे जालना कर्मचारी यांच्या मानसिक स्वास्थ्याचा अभ्यास करणे (महिला पोलीस व पुरुष पोलीस ५०+५०= १०० पोलीस कर्मचारी)
- वयोगट : २० ते ४० वयोगटातील पोलीस कर्मचा-यांचे मानसिक स्वास्थ्य तपासणे.

**गृहितके -**

पोलीस कर्मचारी यांच्या मानसिक स्वास्थ्यांचा अभ्यास करणे

**संशोधनाची मर्यादा :**

प्रस्तुत शोधनिबंध हा जालना शहरापुरताच मर्यादीत आहे. प्रस्तुत शोधनिबंधात २० ते ४० या वयोगटातील पोलीस कर्मचा-यांचा समावेश करण्यात आला.

**संशोधन पद्धतीचा नमुना :**

प्रस्तुत संशोधनात पोलीस कर्मचारी यांच्या मानसिक स्वास्थ्यांचा अभ्यास करण्यात आला. यात मानसिक स्वास्थ्यांची पातळी कशी आहे यांचे मापन करण्याचा प्रयत्न केला आहे.

विश्वसनीयता व वैधता तपासण्यासाठी संशोधकाने मानसिक स्वास्थ्याचे मापन करण्यासाठी जालना शहरातील पोलीस कर्मचारी यांच्याकडुन चाचणी सोडावुन घेण्यात आली.

**परिवर्तके :**

१. स्वतंत्र परिवर्तके :

पोलीस कर्मचारी (महिला ५०, पुरुष ५०)

२. परतंत्र परिवर्तके :

डॉ. कमलेश शर्मा यांची Mental Health Scale

**संशोधन साहित्य :**

प्रस्तुत संशोधनात 'मानसिक स्वास्थ्य' याचा शोध घेण्यासाठी डॉ. कमलेश शर्मा यांनी प्रमाणित केलेली आहे. यामध्ये एकुण ६० विधाने आहे.

**चाचणीची विश्वसनियता:**

| Meth | Efficient of Correlation |
|---|---|
| Test retest | .८६ |
| Split Half | .८८ |

**चाचणीची यथार्थता :**

प्रस्तुत चाचणी ही कमलेश शर्मा यांची असुन Mental Health Scale आहे प्रस्तुत चाचणी Mental Health Scale ही एक यथार्थ चाचणी आहे. चाचणीची यथार्थता .७९% आहे.

**प्रदत्त गोळा करण्याची प्रक्रिया :**

प्रस्तुत संशोधनात जालना पोलीस ठाणे येथे जाऊन भेट घेऊन आदरणीय पोलीस अधिक्षक यांची परवानगी घेण्यात आली व पोलीस कर्मचा-यांकडुन Mental Health Scale - Dr. Kamlesh Sharma यांची सोडावुन घेतली. प्रस्तुत चाचणी पोलीस कर्मचा-यांचे मानसिक स्वास्थ्याचे प्रमाण दाखविण्यात मदत करते त्यामुळे संशोधनासाठी ही चाचणी वापरली.

**मापन साधने :**

**कार्यपध्दती :** या संशोधनासाठी १०० पोलीस कर्मचा-यांची निवड केली यामध्ये ग्रामीण पोलीस ५० शहरी व ५० ग्रामीण अशी निवड केली या सर्व कर्मचा-यांचे प्रत्यक्ष भेट घेऊन सुचना देऊन नंतर चाचणी सोडवुन केली / घेतली. त्यांचे मुल्यमापन केले. प्रयुक्तांच्या प्राप्त झालेल्या गुणांकावरुन Mean मध्यमान, S.D o 'T' Value मुल्य काढण्यात आले.

**संशोधन आराखडा :**

पोलीस कर्मचा-यांचा 'मानसिक स्वास्थ्य' प्रश्नावलीच्या आधारे ग्रामीण व शहरी भेद तपासला, यासाठी डॉ. कमलेश शर्मा यांच्या मानसिक स्वास्थ्य प्रश्नावली तसेच ग्रामीण व शहरी भागातील पोलीस कर्मचा-यांचा तुलनात्मक अभ्यास केला.

**परिवर्तके:**

१. स्वतंत्र परिवर्तके : ग्रामीण व शहरी पोलीस

२. परतंत्र परिवर्तके : मानसिक स्वास्थ्य चाचणी श्रीमती कमलेश शर्मा

**फलितांचे विश्लेषण व चर्चा :**

**संख्याशास्त्रीय - तक्ता क्रं. १**

| Group | Sampling | Mean | S.D. | Df. | T value |
|---|---|---|---|---|---|
| शहरी | ५० | ३९.९ | ३.६० | ५८ | -१.९३ |
| ग्रामीण | ५० | ४२.९ | ३.७६ | | |

Significant at ०.००१ level - T Value २.६६
०.०५ level - T Value २.००

पोलीस कर्मचा-यांचा 'मानसिक स्वास्थ्य' या प्रश्नावलीमध्ये ग्रामीण व शहरी पोलीस यांच्यातील भेद तपासणे हा मुख्य हेतु संशोधन करण्यामागचा होता. वरील तक्ता क्रं. ०१ मध्ये पोलीस कर्मचारी ग्रामीण व शहरी पोलीस प्रशासनामधील भेद तपासण्यात आला. ग्रामीण भागातील ५० पोलीस कर्मचारी प्राप्ताकाचे मध्यमान (Mean) ४२.९ व प्रमाण विचलन (S.D) ३.७६ इतके आले. त्यामुळे दोन्ही मध्यमानातील फरकाचे 'T' मुल्य १.९३ इतके आले. त्यामुळे दोन्ही मध्यमानातील ०.०५ या सार्थकता पातळी भेद दिसुन

आला. यावरुन पोलीस कर्मचारी यांच्या मानसिक स्वास्थ्याचे प्रश्नावली बाबत ग्रामीण व शहरी भेद दिसुन आला. यावरुन ग्रामीण पोलीसाचे मानसिक स्वास्थ्य शहरी पोलीसांच्या तुलनेत उच्च प्रमाणात दिसुन आले. म्हणून वरिष्ठ अभ्युपगमास मिळालेले गुणांक पुष्टी करतात. ग्रामीण भागातील पोलीस कर्मचा-यांचा भौतिक परिस्थितीला संघर्ष करण्याची क्षमता शहरी भागातील पोलीसांची जास्त असते. त्या सुख सुविधा त्यांना ग्रामीण भागात कमी मिळतात. त्यामुळे ग्रामीण भागातील पोलीस कर्मचा-यांमध्ये 'मानसिक स्वास्थ्य' क्षमता जास्त असते. ग्रामीण भागातील व्यक्तीमध्ये एकत्रित राहण्याच्या वृत्ती जास्त असल्यामुळे त्यांच्यामध्ये मानसिक स्वास्थ्य दिसुन येते.

**निष्कर्ष :**

- पोलीस कर्मचा-यांच्या मानसिक स्वास्थ्य प्रश्नावलीमध्ये ग्रामीण व शहरी भेद दिसुन आला.
- ग्रामीण पोलीसांचे मानसिक स्वास्थ्य शहरी पोलीसांच्या मानसिक स्वास्थ्य तुलनेत जास्त दिसुन आले.
- टेबल किंमतीपेक्षा काढलेली किंमत कमी आहे, त्यामुळे ग्रामीण पोलीसांचे मानसिक स्वास्थ्य लक्षणीय फरक दिसुन आले.
- टेबल किंमतीपेक्षा काढलेली किंमती कमी आहे त्यामुळे शहरी पोलीस कर्मचा-यांचा आणि ग्रामीण पोलीस कर्मचा-यांचा मानसिक स्वास्थ्य हे शहरी पेक्षा ग्रामीण पोलीस कर्मचा-यामध्ये लक्षणीय फरक दिसुन आला.

**संशोधनासाठी पुढील शिफारशी:**

अशा प्रकारचे संशोधन S.R.P पोलीस कर्मचारी यांचे करता येईल. अशा प्रकारचे संशोधन अधिक मोठा नमुना घेऊन करता येईल.

- या प्रकारच्या संशोधनात अधिक परतंत्र घटकांचा वापर करता येईल.
- जिल्हा पोलीस कर्मचारी याच्या ताण तणाव व्यवस्थापन करण्यासाठी कार्यशाळा घेण्यात याव्या.
- पोलीस कर्मचारी वर्गासाठी योगा व ध्यान धारणा यांचे प्रशिक्षण देण्यात यावे.

**संदर्भ -**

- मानसशास्त्राची मुलतत्वे - वि.दी. तडसरे
- मानसशास्त्र परिभाषा कोष - श्रीपाद जोशी
- प्रायोगिक मानसशास्त्र संशोधन पध्दती - डॉ. भरत देसाई शोभंना अभ्यंकर शिला गोविळकर
- पोलीस मार्गदर्शिका - पोलीस प्रशिक्षण केंद्र राज्य राखीव बल गट क्रं. २
- www.sakal.in
- Encyclopedia.com